# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मेळघाट (जि.अमरावती) येथे अंधश्रध्दा प्रतिबंध कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत**

**(१) ५६७६ (०९-४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने पारित केलेल्या अंधश्रध्दाविरोधी कायद्याचा उल्लंघन करून मेळघाट (जि.अमरावती) येथे अघोरी उपचाराचे प्रकार सर्रासपणे सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासींचा वैद्यकीय क्षेत्राबद्दल विश्वास संपादन करण्याबाबत त्यांच्यामध्ये जनजागृती करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे : (१२-०६-२०१९) :** (१) नाही.

(२) व (३) महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबध त्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी अधिनियम २०१३ या कायद्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी शासनाने जादुटोणा विरोधी कायदा, जनजागृती अंमलबजावणी समिती गठीत केली असून या समितीमार्फत जिल्हयास्तरावर प्रचार व प्रसार करण्यासाठी सन २०१४-१५ या कालावधीमध्ये कार्यशाळा घेतल्या आहेत. त्याचप्रमाणे दरवर्षी सदर कायद्याच्या प्रसारासाठी नियमित जाहिराती देण्यात येतात.

---

**पुणे जिल्ह्यात निकृष्ट दर्जाच्या बायोमेट्रीक मशीन खरेदी केल्याबाबत**

**(२) ६६२१ (०९-०४-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे अतिरिक्त सहसंचालक, समाज कल्याण संचालनालय यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पुणे जिल्ह्यातील अनुदानित वसतिगृहांचे संस्थाचालक व वसतिगृह कर्मचाऱ्यांची बैठक घेतली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत शासनाने लागू केलेल्या बायोमेट्रीक प्रणालीच्या मशिन नादुरुस्त असल्याने सदर मशीन कंपनीकडे दुरुस्तीसाठी नेली असता ४ ते ५ महिन्याचा कालावधी लागतो त्यामुळे शासनाकडून संस्थांना दरमहा मिळणाऱ्या अनुदानासाठी बायोमेट्रीकची उपस्थित संगणक प्रत असल्याशिवाय मानधन व अनुदानाचे देयक दिले जात नाही, अशी तक्रार उपस्थित कर्मचारी व संस्थाचालकांनी बैठकीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले तसेच दोषी संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे : (२६-०७-२०१९) :** (१) होय.

(२) बायोमॅट्रीक यंत्रांच्या दुरुस्तींसाठी येणारा खर्च संबंधित संस्थाचालकांनी करावयाचा आहे परंतु संस्थाचालक हा खर्च करण्यास तयार नसल्याने या यंत्राच्या दुरुस्तीचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. परंतु बायोमॅट्रीक उपस्थितीपत्रक अनिवार्य करण्यात आलेले नसल्याने कोणत्याही कर्मचाऱ्याचे मानधन रोखण्यात आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिनींग प्रेसींग उद्योग अडचणीत आल्याबाबत**

**(३) २१४३० (१९-०८-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कापसाच्या एकूण क्षेत्रापैंकी अर्धे क्षेत्र विदर्भात असूनही येथील जिनींग प्रेसींग उद्योग मोडकळीस आलेले आहेत व सुतगिरण्या सुध्दा बंद पडलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांची कोंडी झालेली असून कापसाच्या उत्पादन खर्चावर आधारित दर मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील शेतकरी अत्यंत आर्थिक अडचणीत आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.राम शिंदे : (११-०६-२०१९) : (**१) हंगाम २०१५-१६ मध्ये विदर्भात एकूण ४०% क्षेत्र पेरा कापसाचा होता. कापूस एकाधिकार खरेदी योजना २००२-०३ नंतर पुढे राबविणे शक्य न झाल्याने एकाधिकार कापूस खरेदी योजनेतील काही अटी शिथील करुन खाजगी खरेदीदार तसेच खाजगी सूतगिरण्यांना कापूस खरेदीकरिता परवाने देण्यात आले आहेत. ज्या खाजगी खरेदीदारांनी त्यांच्या प्रक्रिया क्षमतेत वाढ व आधुनिकीकरणाद्वारे जिनिंग प्रेसिंगची क्षमता वाढवून त्यावर आधारित जोडधंदे निर्माण केले अशा जिनिंग प्रेसिंग फॅक्ट्रीत वाढ झाल्याचे दिसून येते. मात्र, काही जुनी मशिनरी व प्रक्रिया क्षमता कमी या कारणांमुळे विदर्भातील एकूण २८१ खाजगी जिनिंग प्रेसिंग युनिटपैकी १९९ जिनिंग प्रेसिंग युनिट चालू असून ८२ युनिट बंद आहेत आणि १०० सहकारी जिनिंग प्रेसिंग संस्थांपैकी २८ जिनिंग प्रेसिंग संस्था चालू असून ३४ संस्था बंद आहेत व ३८ संस्था अवसायनात आहेत. तसेच, विदर्भात ६७ सहकारी सुतगिरणीची नोंदणी करण्यात आली आहे. त्यापैकी ३५ सहकारी सुतगिरण्यांचा वेगवेगळ्या पंचवार्षिक योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी ५ अवसायनात, २ बंद व २ ची नोंदणी रद्द केली असून २६ उभारणीखाली/अंशत: उत्पादनाखाली/ पूर्ण उत्पादनाखाली आहेत.

(२, (३) व (४) हे खरे नाही.

केंद्र शासनाकडून प्रत्येक वर्षातील हंगामाकरिता किमान आधारभूत किंमत जाहीर केली जाते. या जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीवर महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ व सीसीआय द्वारे कापसाची खरेदी प्रत्येक वर्षी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोताळा (जिल्हा बुलढाणा) येथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाबाबत**

**(४) २८७७० (२३-१२-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मोताळा (जिल्हा बुलढाणा) येथे मंजूर झालेले मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे वसतीगृह अद्यापही जागेअभावी सुरू झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी अवसायानात असलेल्या मोताळा खरेदी विक्री संघाची जागा उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव सामाजिक न्याय विभागाने शासनाकडे सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (२६-०७-२०१९) :** (१) नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त मोताळा जि.बुलढाणा येथे मंजूर करण्यात आलेले मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह सध्या भाडयाच्या इमारतीत सुरु करण्यात आलेले आहे.

(२) होय.

(३) शासनास जमीन न मिळाल्याने तसेच शासकीय जमीन उपलब्ध न झाल्याने वसतीगृहासाठी खाजगी जमिन घेण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दलितांवर होणारे अत्याचार रोखण्याबाबत**

**(५) ३१६३६ (२३-१२-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दलित अत्याचार रोखण्यास अपयश येत असून उपाययोजना कराव्यात तसेच अत्याचार पिडित दलितांना दहा लाख रुपयांची मदत मिळावी व इतर मागण्या‍ाठी लोकप्रतिनिधींनी, सामाजिक संघटनांनी मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री तसेच मा.सामाजिक न्यायमंत्री यांचेकडे दिनांक २ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास तसेच वारंवार मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रश्नी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच राज्यातील दलितांवरील होणारे अत्याचार थांबवून त्यांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या सोडविण्यासाठी सदर प्रकरणी आवश्यक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०६-०७-२०१९) :** (१) दि.०२/०८/२०१५ चे निवेदन अप्राप्त आहे. तथापि दि.१४/०७/२०१५ च्या पत्रान्वये मागासवर्गीय बांधव मुलभूत व पायाभूत सुविधांपासून वंचित असल्यामुळे त्यांना सामाजिक विभागामार्फत २ कोटी निधीची तरतूद करण्याचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) केंद्र शासनाने सुधारित कलेल्या अनुसूचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ सुधारित नियम २०१६ च्या अधिन राहून अत्याचाराचे प्रकार किंवा गुन्ह्याचे प्रकार किंवा त्यासाठी केंद्र शासनाने दि.१४/०४/२०१६ च्या अधिसुचनेनुसार विहित केलेल्या सुधारित दराप्रमाणे नुकसान भरपाई देण्याचा निर्णय राज्य शासनाने दि.२३/१२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मागासवर्गीय वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांना परिपोषण अनुदान मिळण्याबाबत**

**(६) ३२४९१ (१८-०१-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागामार्फत चंद्रपूर जिल्हा परिषदेअंतर्गत ६८ अनुदानित मागासवर्गीय वसतिगृहे असून या वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांचे परिपोषण अनुदान मागील दोन वर्षांपासून देण्यात आले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील वसतिगृहांच्या थकीत व चालू अनुदानापोटी समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त व समाज कल्याण संचालनालयाच्या पुणे येथील आयुक्तांकडे पाच कोटी ७५ लाख रूपयांची मागणी चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने केली असून केवळ एक कोटी ३१ लाख रूपये अनुदान देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वसतिगृहांच्या अनुदानाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी सुमारे पावणे सहा कोटी रुपयांची आवश्यकता असून चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने माहे मे, २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत शासनाकडे पत्र लिहून निधीची मागणी केली आहे तसेच या वसतिगृहांना पुरविण्यात येणारे साहित्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून वापरण्यायोग्य नसल्याचा आरोप संस्थाचालकांकडून करण्यात आला आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यातील उक्त वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांचे परिपोषण अनुदान व जि.प.चंद्रपूर समाजकल्याण विभागाने अनुदानाची केलेली मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२६-०७-२०१९) :** (१) आवश्यक अनुदान प्राप्त झालेले नसल्याने परिपोषण अनुदानाची रक्कम प्रलंबित होती

(२) होय.

(३) व (४) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना मार्च, २०१६ मध्ये आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येऊन या वसतीगृहांची निधीची मागणी पूर्ण करण्यात आलेली आहे.

तसेच, या वसतीगृहांसाठी पुरवठा करण्यात आलेल्या वस्तू निकृष्ठ दर्जाच्या असल्याबाबत संस्थांची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

---

**राज्यातील वाढलेले भाज्याचे दर समतोल ठेवण्याबाबत**

**(७) ४३७६९ (२८-०४-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वच भाज्याच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात वाढलेले भाज्याचे दर समतोल ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे : (०४-०६-२०१९) :** (१), (२), (३) व (४) मागील काही वर्षापासून राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे बाजारात भाज्यांचा पुरवठा कमी होऊन अल्पकाळासाठी भाववाढ होते. ही तुट भरून काढण्यासाठी शासनाच्या निदर्शनानुसार ज्या विभागात भाजीपाल्याचे उत्पादन मोठया प्रमाणात झालेले आहे अशा विभागातून इतरत्र भाजीपाल्याचा पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे भाजीपाल्याचा पुरवठा सुरळीत होऊन दर कमी होतात.

---

**ता.सिन्नर (नाशिक) येथे येणाऱ्या अनुसूचित जातीच्या उच्च शिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थ्यांच्या निवास व भोजन व्यवस्थेबाबत**

**(८) ४५४६४ (२५-०४-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.सिन्नर (नाशिक) येथे येणाऱ्या अनुसूचित जातीच्या उच्च शिक्षण घेण्याऱ्या विद्यालयीन तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या निवास व भोजनाची व्यवस्था होणे नितांत गरजेचे असल्याने समाजकल्याण विभागाचे १०० मुलींचे व १०० मुलांचे वसतिगृह मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे : (२६-०७-२०१९) :** (१) होय.
(२) ज्या तालुक्यामध्ये शासकीय वसतीगृह नाही अशा तालुक्यामध्ये मागासवर्गीय मुला-मुलींसाठी शासकीय वसतीगृह सुरु करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धामणगाव (जि.अमरावती) येथील इतर मागासवर्गीयांना घरकुल देण्याबाबत**

**(९) ४६३३४ (२५-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगाव (जि.अमरावती) येथील इतर मागासवर्गीयांच्या घरकुलाकरिता १०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित प्रशासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, किती कालावधीत या भागातील इतर मागासवर्गीयांना घरकुल देण्यात येतील,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे : (१४-०६-२०१९)** : (१), (२), (३) व (४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लाभार्थ्यांसाठी रमाई घरकुल आवास योजना राबविली जाते.

इतर मागासवर्गीय घटकासाठी कोणतीही घरकुलाची योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविली जात नाही.

---

## मागासवर्गीय आणि आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) ४८२७३ (२८-०४-२०१६). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मागासवर्गीय आणि आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे याकरिता निवासाची सोय म्हणून स्थापन केलेल्या वसतिगृहांत विद्यार्थ्यांना मुलभूत सोयी-सुविधाच उपलब्ध नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगांव जिल्हयातील अनेक वसतिगृहांमध्ये मुलभूत सुविधा नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मुलभुत सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (२६-०७-२०१९) :** (१) नाही.

(२) जळगांव जिल्हयामध्ये एकुण १२ शासकीय वसतीगृहे असून या वसतीगृहामधील प्रवेशीत विदयार्थ्यांना शासन निर्णय २६ जुलै, २०११ मधील तरतुदीनुसार सोयी सुविधा पुरविण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतीगृहांचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(११) ५५२५३ (२८-०८-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील मागासवर्गीय मुला-मुलींच्या १०७ वसतीगृहांत मागील दोन वर्षापासून अनुदान रखडल्याने अडचणीत आल्याची माहिती दिनांक १४ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वसतीगृहात सुमारे साडेचार हजार विद्यार्थी व ३५० पेक्षा अधिक कर्मचारी असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने संबंधित वसतिगृहांना आतापर्यंत अनुदान दिलेले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे : (२६-०७-२०१९) :** (१) होय.

सन २०१६-१७ मध्ये पुरेशा निधी अभावी कर्मचाऱ्यांचे परिपोषण अनुदान अदा करता आले नाही.

(२) होय.

अहमदनगर जिल्हयात एकुण १०७ वसतीगृहे कार्यरत असुन या वसतीगृहाची मान्य संख्या ४८०० इतकी आहे. या वसतीगृहात एकुण ३५४ कर्मचारी मानधन तत्वावर कार्यरत आहेत.

(३) सन २०१८-१९ या वर्षाचे फेब्रुवारी, २०१९ पर्यंतचे कर्मचारी अनुदान अदा करण्यात आले आहे.

तसेच, सन २०१६-१७ चे १००% सन २०१७-१८ चे ६०% परिपोषण अनुदान अदा करण्यात आलेले असून सन २०१७-१८ चे ४०% अनुदान अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

तर २०१८-१९ चे १००% अनुदान उपलब्ध तरतुदीतून अदा करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील सर्वे नं.६८ मधील जागेवर अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या मुला-मुलींसाठी शासकीय निवासी आश्रम शाळा उभारण्याबाबत

**(१२) ६५४९५ (२७-०१-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ तालुक्यातील (जि.ठाणे) मौजे-चिखलोली येथील सर्वे नं.६८ मधील जागेवर अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या मुला-मुलींसाठी शासकीय निवासी आश्रम शाळा उभारण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी ठाणे यांनी त्यांच्या दिनांक १० मार्च, २०१६ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव कोकण विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत मंत्रालय स्तरावर मागविण्याची विनंती अंबरनाथ येथील लोकप्रतिनिधीनी त्यांच्या दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या पत्रान्वये महसूल विभाग यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत कोणता निर्णय घेण्यात आला व उक्त ठिकाणी शासकीय निवासी आश्रमशाळा केव्हा उभारण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१९-०६-२०१९) :** (१), (२) व (३) मौजे चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील सर्वे नं.६८ मधील जागेवर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील २०० विद्यार्थी क्षमता असलेले शासकीय निवासी शाळेचे बांधकामाचे नकाशे प्राप्त झाले असून ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक बाबींची छाननीकरीता सादर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपाबाबत

**(१३) ६७२३० (२७-०१-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांनी दिनांक १९ ऑक्टोंबर, २०१६ पासून संप पुकारला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाबाबत वारंवार अर्ज-विनंत्या करुनही प्रशासनाने कोणताही सकारात्मक प्रतिसाद न दिल्याने "रयतराजा कामगार संघटने"च्या नेतृत्वाखाली मुंबई येथील आझाद मैदान बेमुदत संप व आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त कर्मचाऱ्यांच्या कोणकोणत्या मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत व सदर मागण्यावर अद्यापही निर्णय न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर मागण्यावर त्वरित निर्णय होण्यासाठी शासनामार्फत कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. सुभाष देसाई (०६-०५-२०१९) :** (१) हे खरे आहे.
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांनी दि.१९ ऑक्टोबर, २०१६ पासून संपावर जाण्याचा निर्णय घेतला होता. तथापि, अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांनी दिनांक १८ ऑक्टोबर रोजी संप मागे घेत असल्याचे घोषित केले.
(२) दि. १८ ऑक्टोबर २०१६ रोजी MSEMA (Maharashtra Essential Service Maintenance Act) लागू करुन महामंडळाची अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा घोषित

करुन अग्निशमन कर्मचा-यांमार्फत आझाद मैदान येथे पुकारलेल्या धरणे आंदोलन व बेमुदत संपाला प्रतिबंध केला. त्यामुळे अग्निशमन विभागातील काही कर्मचाऱ्यांनी दि. १९ ऑक्टोबर २०१६ रोजीचा पुकारलेला संप दि.१८ ऑक्टोबर, २०१६ रोजीच संप मागे घेतला.
(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे सक्षम प्राधिकरण असल्याने त्यांचे निर्णय हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळामार्फत घेतले जातात.
(४) अग्निशमन विभागातील काही कर्मचा-यांनी त्यांच्या मागण्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या, औरंगाबाद खंडपिठासमोर याचीका दाखल केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे न्यायालयाच्या निर्णया प्रमाणे तसेच महामंडळाच्या संचालक मंडळामार्फत योग्य ते निर्णय घेण्यात येत आहेत.

---

## भिवंडी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने सभेमध्ये केलेल्या नियमबाह्य ठरावाची चौकशी करण्याबाबत

**(१४) ६९६६६ (२७-०१-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने सभेमध्ये केलेल्या नियमबाह्य ठरावाची चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या सभापती व सचिव-कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्यावर कारवाई करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सहकार राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक १४ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये घेतलेल्या नियमबाह्य ठरावाची चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत पणन संचालक, पणन संचालनालय, पुणे यांनी दिनांक ५ फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास आदेश देऊनही सभापती व सचिव-कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्याकडून अद्यापही कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (११-०७-२०१९) :** (१) व (२) अशंत: खरे आहे,

भिवंडी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने सभेमध्ये केलेल्या नियमबाहय ठरावाची चौकशी करून कृषी उत्पन्न बाजार समिती, भिवंडी येथील सभापती व सचिव यांच्यावर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि.१४ जून, २०१६ रोजीचे लेखी निवेदन मा.राज्यमंत्री (सहकार) यांचेकडे प्राप्त झालेले नाही.

मात्र पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.०५.०२.२०१४ रोजीच्या निर्देशानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे या कार्यालयाने दि.०७.०२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये

कृषी उत्पन्न बाजार समिती, भिवंडी या बाजार समितीचे सभापती / सचिव यांना नियुक्ती रद्द करण्याचे कळविले होते. तसेच ठरावास अनुमोदक दिलेल्या दोन्ही संचालक यांना अपात्र ठरविण्याबाबतचा खुलासा मागविला होता. परंतु दरम्यान सदर बाजार समितीवर कार्यरत असलेले संचालक मंडळ बरखास्त करून, दि.१२.११.२०१४ रोजीच्या आदेशान्वये प्रशासक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांच्या दि.२८.०६.२०१७ रोजीच्या पत्रानुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भिवंडी यांच्यामार्फत दि.२३.०९.२००४ व दि.२०.०७.२०११ रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये झालेल्या ठरावाबाबत चौकशी करण्यात आली. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भिवंडी यांनी चौकशी अहवालात श्री.पवन भोईर यांना बाजार समितीच्या सेवेत कायम करण्यास पणन संचालकांनी मान्यता दिली आहे. तसेच श्री.भावेश पाटील व अन्य ५ कनिष्ठ लिपिक यांची रितसर वर्तमान पत्रात जाहिरात देऊन नेमणुक करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र कृषि उत्पन्न (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम व नियमामध्ये व उपविधीमध्ये कृषि उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांच्या मुलांना कृषी उत्पन्न बाजार समितीत घेण्यात येऊ नये अशी कोणतीही तरतुद नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळमनुरी (जि.हिंगोली) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय शासकीय मुलांच्या वसतिगृहातील तक्रारींबाबत

**(१५) ७२०७२ (२७-०१-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) येथील समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणा-या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय शासकीय मुलांच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना कंत्राटदाराकडून निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वसतिगृहात शिक्षणासाठी राहत असलेल्या ४० विद्यार्थ्यांना शालेय निर्वाह भत्ता अद्यापपर्यंत वाटप करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथील विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे अधिकारी लक्ष देत नसल्याने भोजनाचे कंत्राट घेतलेल्या कंत्राटदाराकडून शासनाच्या निकषाप्रमाणे कुठलीही आहार व्यवस्था विद्यार्थ्यांना पुरविली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२२-०७-२०१९) :** (१) नाही.

(२) वसतीगृहामधील विदयार्थ्यांच्या निर्वाह भत्याकरिता पुरेशी तरतूद उपलब्ध न झाल्याने काही विदयार्थ्यांना वेळेत निर्वाह भत्ता अदा करता आलेला नाही. परंतु तरतूद उपलब्ध होताच विदयार्थ्यांना निर्वाहभत्ता अदा करण्यात आलेला असून विदयार्थ्यांची कोणतीही तक्रार नाही.

(३) या वसतीगृहासाठी कंत्राटदारामार्फत भोजन पुरविण्यात येत नसून, शासकीय मेसव्दारे विदयार्थांना भोजन देण्यात येते. विदयार्थ्यांना योग्य प्रकारे भोजन पुरवठा करण्यात येत असून, भोजनाबाबत विदयार्थ्यांची कोणतीही तक्रार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील १३ औद्योगिक वसाहतीत उद्योगांसाठी वितरीत करण्यात आलेले भूखंड विनावापर पडून असल्याबाबत**

**(१६) ७२३६२ (२७-०१-२०१७). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील १३ औद्योगिक वसाहतीत उद्योगांसाठी दिलेल्या ८८९ भूखंडापैकी २८२ भूखंड वितरणानंतरही रिकामे असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर, नवीन चंद्रपूर, ताडाळी या एम.आय.डी.सी. क्षेत्रांतर्गत किती भूखंडाचे वितरण करण्यात आले,

(३) तसेच शासनाने बंद उद्योग सुरु करण्याकरीता कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०३-०४-२०१९) :** (१) हे अशंत: खरे आहे

तथापि आजमितीस चंद्रपूर जिल्हयातील १३ औद्योगिक वसाहतीत भूखंडाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | एकूण भूखंडाचचे आरेखन | ९३९ |
| २) | आवंटन केलेले भूखंड | ७३४ |
| ३) | उत्पादन सुरु असलेले भूखंड | २३२ |
| ४) | उत्पादन जावून बंद पडलेले भूखंड | १०२ |
| ५) | बांधकामाखालील भूखंड | ७३ |
| ६) | वाटप केलेले परंतु मोकळे भूखंड | ३२७ |

मोकळया असलेल्या ६१ भूखंड धारकांना उद्योग संजीवनीचा लाभ देण्यात आलेला असून ९१ भूखंडाचा विकास कालावधी संपलेला आहे व १६७ पैकी ३ भूखंडाचा सन २०१८ पर्यंत, १८ भूखंडाचा सन २०१९ पर्यंत, ३० भूखंडाचा सन २०२०, २३ भूखंडाचा सन २०२१, ८४ भूखंडाचा सन २०२२, तर ९ भूखंडाचा विकास कालावधी २०२३ पर्यंत शिल्लक आहे.

(२) चंद्रपूर-नविन, चंद्रपूर येथे ३७७ व ताडाळी येथे १५५ भूंखडाचे वितरण गरजू उद्योगास करण्यात आलेले आहे.

(३) व (४) शासनाकडून बंद उद्योगास सुरु करण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

१) आजारी लघु उद्योगांना पुनरुज्जीवन देणे

शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २००७ नुसार आजारी औद्योगिक घटकांना वित्तीय सहाय्य करणाऱ्या बँक/वित्तीय संस्थांनी संबंधित आजारी उद्योग घटकांकरिता शुश्रुषा कार्यक्रमांतर्गत पुनरुज्जीवन योजनेचा प्रस्ताव त्यामध्ये योजना सुरु होण्याच्या दिनांकासह योजनेचा कालावधी नमूद करुन संबंधित जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाकडे सादर करावा लागतो. त्यानंतर सदर औद्योगिक घटकास आजारी उद्योग प्रमाणपत्र योजना सुरु होणाऱ्या दिनांकासह योजनेचा कालावधी नमूद करुन देण्यांत येतो.

संबंधित आजारी लघु उद्योगाला वित्तीय सहाय्य करणाऱ्या वित्तीय संस्था/बँका यांनी बनविलेल्या पुनरुज्जीवन योजनेत राज्य शासनातर्फे पुढीलप्रमाणे सोयी सवलती देण्यांत येतात.

शुश्रुषा कार्यक्रम अंमलात येण्याच्या दिनांका दिवशी राज्य शासनाची सर्व थकीत देणी म्हणजेच विक्रीकर, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या थकबाकीची मूळ रक्कम, व्याज व दंडनीय व्याज इ. सह जी एकूण रक्कम येईल ती सर्व रक्कम थकबाकी म्हणून समजण्यांत येईल. या थकबाकीची वसुली आजारी उद्योग घटकाकडून ६० मासिक हप्त्यामध्ये व त्यावर ७ टक्के वार्षिक व्याजाने परतफेड करण्यांत येते.

२) महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ नुसार पुनरुज्जीवन-क्षम नसलेल्या तसेच बंद घटकांसाठी विशेष अभय योजना (स्पेशल ॲम्नेस्टी स्कीम)

पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद उद्योग घटकांची जमिनीसकटची स्थिर मालमत्ता वापरात येण्याच्या दृष्टीकोनातुन अशा उद्योग घटकांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी सदर योजना शासनाने जाहीर केलेली आहे.

पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या व बंद उद्योग घटकांकडील शासकीय देणी थकीत असल्यास, त्या थकीत देणीची मुद्दल रक्कम, घटकाने एकरकमी भरल्यास त्यावरील व्याज व दंडनीय रक्कम माफ करुन त्या उद्योग घटकाची स्थिर मालमत्ता अन्य उद्योजकाकडे हस्तांतरीत करण्यास विशेष अभय योजनेद्वारे मान्यता देण्यांत आलेली आहे.

सदर योजनेचा लाभ खालील निकष पूर्ण करणाऱ्या उद्योग घटकांना देण्यांत येतो.

अ) एक वर्षापेक्षा कालावधीसाठी बंद बसलेल्या किंवा न्यायालयाकडून नादार/ दिवाळखोर (Insolvent) म्हणून घोषित झालेला उद्योग घटक.

ब) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सुत्रानुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या उद्योग घटक

क) उद्योग घटक हस्तांतरणामुळे घटकाच्या व्यवस्थापनात बदल होऊन घटक पुढे यशस्वीरित्या चालु राहील.

शासन निर्णय दिनांक ०६/०५/२०१६ अन्वये विशेष अभय योजनेचा कालावधी दिनांक ३१/०३/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

---

**मानखुर्द (मुंबई पूर्व) येथील 'द चिल्डेन्स एड सोसायटी' च्या बालगृहात महिलेसह मतीमंद मुलांचा झालेला मृत्यू**

**(१७) ७४३५७ (२१-०४-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मानखुर्द येथील द चिल्ड्रन्स ऐड सोसायटी या बालगृहात ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६ या दोन महिन्याच्या कालावधीत १ महिला व ४ मतिमंद मुलांच्या झालेल्या मृत्युप्रकरणी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर यांनी पाठविलेल्या मृत्युबाबतच्या अहवालाची चौकशी करण्याकरिता नेमलेल्या आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्या चौकशी समितीची चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीतील निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने उक्त मृत्युप्रकरणी जबाबदार असलेल्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२०-०६-२०१९) :** (१) होय.

(२) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सुरक्षेसाठी तैनात केलेल्या मार्शल डॉग स्कॉड कंपनीबाबत**

**(१८) ८०१२६ (२१-०४-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सुरक्षेसाठी तैनात केलेल्या मार्शल डॉग स्कॉड या कंपनीने हजेरी पत्रक संबंधित मार्केटच्या उपसचिवांच्या सहीने लेखा विभागात पाठविणे आवश्यक असताना नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांच्या हजेरी पत्रकांवर उपसचिवांच्या बोगस स्वाक्षरी करुन सादर केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित कंत्राटदार कंपनीविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (११-०७-२०१९) :** (१) होय.

(२) बाजार समितीने संबंधित कंत्राटदाराचा ठेका रद्द केला आहे.

तसेच सदर प्रकरणाची बाजार समिती स्तरावर चौकशी अधिकारी नेमुन चौकशी करण्यात आली आहे. चौकशीत दोषी ठरलेल्या मुख्य सुरक्षा अधिकारी यांच्या तीन वेतनवाढी, तीन वर्षाकरिता रोखण्याची आणि उर्वरित दोन सुरक्षा अधिकाऱ्यांच्या प्रत्येकी एक वेतनवाढ, एक वर्षासाठी रोखण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाथरी (जि.परभणी) येथे मोंढा बाजार खरेदी विक्रीचे व्यवहार बंद असल्याबाबत**

**(१९) ८२९७७ (२१-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाथरी (जि.परभणी) येथे मोंढा बाजार व तेथील खरेदी विक्रीचे व्यवहार दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास बंद झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खरेदी-विकीचे व्यवहार बंद होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांनी जिल्हा उपनिबंधकांना अहवाल दिला आहे, हे ही खरे आहे आय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (११-०७-२०१९) : (**१) होय.
(२) शेतमालाचे बाजार भाव हे हमीदरापेक्षा कमी असल्याने खरेदी करण्यांस असमर्थ असल्याच्या कारणामुळे दि.१६.०१.२०१७ ते दि.२५.०१.२०१७ या कालावधीत आडत व्यापारी असोसिएशन, पाथरी यांनी खरेदी विक्रीचे व्यवहार बंद ठेवले होते.
(३) नाही.
(४) पाथरी (जि.परभणी) येथे मोंढा बाजार व तेथील खरेदी विक्रीचे व्यवहार दिनांक १६ जानेवारी, २०१७ वा त्यासुमारास बंद झाले आहेत, याबाबत बाजार समितीच्या सचिवांनी जिल्हा उपनिबंधकांना अहवाल दिला नाही, तथापि, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) १९६३ चे कलम ३२-क व त्याखालील नियम १९६७ चे नियम ९४ (क) मधील तरतूदीनुसार संप काळातील पर्यायी व्यवस्था केलेली नसल्याने सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पाथरी यांच्याविरूध्द महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) १९६७ चे नियम १०२ (४) नुसार कार्यवाही करणेबाबत सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, पाथरी जि.परभणी यांना दि.०८.०२.२०१९ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कृषी उत्पन्न बाजार समिती, देऊळगांव राजाचे (जि.बुलढाणा) सभापती व संचालक यांनी केलेल्या आदर्श आचार संहितेच्या उल्लंघनाबाबत

**(२०) ८३७३३ (२१-०४-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समिती, देऊळगांव राजा चे सभापती व संचालक यांनी केलेल्या आदर्श आचार संहितेच्या उल्लंघनाबाबत दिनांक २२ नोव्हेंबर, २०१६ रोजी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी, बुलढाणा यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेने निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार आदर्श आचार संहितेचे उल्लघंन करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.राम शिंदे (१४-०६-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) निवडणूक निर्णय अधिकारी, नगर परिषद सार्वत्रिक निवडणुक २०१६ नगर परिषद देऊळगांव राजा यांनी या तक्रारीच्या अनुषंगाने अर्जदार व गैरअर्जदार यांची सुनावणी घेतली. सुनावणीत दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या दि.२२.११.२०१६ रोजीच्या निवेदनाप्रमाणे आदर्श आचार संहितेचे उल्लंघन झालेले नसल्यामुळे, तक्रार अर्ज दि.२१.१.२०१७ रोजीच्या आदेशाअन्वये निकाली काढला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगोला (जि.सोलापूर) येथे डाळींब प्रक्रिया उद्योगांतर्गत पॅकींग ग्रेडिंग व एरियल प्रकल्प सुरु करण्याबाबत

**(२१) ८८०४५ (१८-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील डाळींब उत्पादक शेतक-यांना अधिक दर मिळावा यासाठी अखिल भारतीय डाळींब उत्पादक संघाने सांगोला (जि.सोलापूर) येथे डाळींब प्रक्रिया उद्योगांतर्गत पॅकींग ग्रेडिंग व एरियल असे दोन प्रकल्प सुरु करण्यासंदर्भात मा.कृषी व पणन मंत्री, कृषी, पणन विभाग यांचेकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१९-०६-२०१९) :** (१) नाही. असा प्रस्ताव पणन विभागाकडे प्राप्त झालेला नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयात डाळिंबाचे मोठया प्रमाणात झालेल्या उत्पादनामुळे दर घसरल्याबाबत**

**(२२) ८९१२४ (१८-०८-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात अनेक वर्षानंतर, डाळिंबाचे मोठया प्रमाणात उत्पादन झाले असताना, दिड रुपये किलो इतक्या कवडीमोल भावाने, डाळिंब विकावे लागत असून, उत्पादन खर्चही निघत नसल्याने, राज्यातील नाशिक येथील डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू डाळिंब उत्पादनाचे विक्री दर घसरण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, राज्यातील आर्थिकदृष्टया अडचणीत आलेल्या डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य त्याचबरोबर निर्यातीच्या प्रमाणामध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (११-०७-२०१९) :** (१) नाशिक जिल्हयातील सटाणा, नाशिक व मालेगांव या तीन बाजार समितीमध्ये दि.२४.०४.२०१७ ते २८.०४.२०१७ या कालावधीत आरक्ता व शेंद्रीया या दोन प्रकारच्या डाळिंबाची आवक झाली होती. या कालावधीत सटाणा व नाशिक बाजार समितीत खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले होते :-

(दर प्रति क्विंटल)

| डाळिंबाचा प्रकार | किमान दर | कमाल दर | सरासरी दर |
|---|---|---|---|
| आरक्ता | रू.१३७ | रू.२,५०० | रू.१,५०० |
| शेंद्रिया | रू.३०० | रू.४,३७५ | रू.३,००० |

मालेगांव बाजार समितीत सरासरी दर रू.६,४००/- प्रति क्विंटल प्राप्त झाले होते.
(२) एप्रिल महिन्यामध्ये आंबा या फळाची बाजारात आवक सुरू होत असल्याने, डाळिंबाची मागणी कमी होऊन डाळिंबाचे दर कमी होतात.
(३) व (४) डाळिंब हा नाशवंत शेतमाल आहे. त्यामुळे डाळिंबासाठी किमान आधारभूत किंमत निश्चित केली जात नाही. तसेच शासनाने फळे व भाजीपाला दि.५ जुलै, २०१६ पासून बाजार समितीच्या यार्डाबाहेर नियमनमुक्त केला आहे.

---

**मौ.जुचंद्र (ता.वसई, जि.पालघर) येथील शासकीय जमीन वसई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२३) ९०९१५ (२३-०८-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.जुचंद्र, (ता.वसई, जि.पालघर) येथील ५.६९.४ हे.आर. क्षेत्रफळ असलेली शासकीय जमीन वसई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डसाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मागणी केलेले प्रस्तावित जमिनीचे प्रकरण सन २०१२ पासून कोकण विभागीय आयुक्त कार्यालय, नगरविकास विभाग, महसूल विभाग इ. शासकीय विभागांमध्ये प्रलंबित असून अद्यापी कोणताही निर्णय झालेला नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२९-०६-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) मौजे जुचंद्र ता.वसई, जि.पालघर येथील वसई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डसाठी मागणी केलेली शासकीय जमीन सन २०१५ मध्ये केंद्र शासनाने वेटलँड नियम लागू केल्यामुळे, या शासकीय जमीनीवर आता कोणतेही विकास कामे करण्यास मनाई आहे. त्यामुळे जुचंद्र येथील जमीन मागणीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुका कृषि उत्पन्न बाजार समिती (विटा) या संस्थेला सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२४) ९१५३२ (२३-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती विटा या संस्थेस आवश्यक सोयीसुविधा नसल्याने शेतक-यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीनी या संस्थेला सोई-सुविधांकरिता निधी मिळणेबाबत माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.पणन मंत्री यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (११-०७-२०१९) :** (१) होय,
(२) बाजार समित्यांना सोयीसुविधा उभारण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्याची कोणतीही योजना शासन स्तरावर मंजूर नाही. त्यामुळे शासन स्तरावरून मागणीप्रमाणे निधी उपलब्ध करून देता येत नाही.

परंतु, बाजार समितीस पायाभूत / मुल्यवर्धीत सुविधा उभारण्यासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजना व अपेडा यांचे योजनेनुसार प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना कृषि पणन मंडळामार्फत देण्यात आल्या होत्या. मात्र, या योजनांअंतर्गत सुविधा उभारण्यासाठी एकुण खर्चाच्या अनुक्रमे ७५ व ६० टक्के निधी बाजार समितीने स्वत उभारणे आवश्यक आहे. बाजार समितीकडे प्रस्तावित सोयीसुविधांच्या एकूण खर्चाच्या अनुक्रमे ७५ व ६० टक्के निधी उपलब्ध नसल्यामुळे बाजार समितीस प्रस्ताव सादर करता आलेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तृतीयपंथीयांच्या हक्काचे संरक्षण करण्याच्या अध्यादेशाची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(२५) ९५३५३ (२३-०८-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने तृतीयपंथीयांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी सन २०१४ मध्ये तृतीयपंथी संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ३ वर्षापूर्वी त्यासंदर्भात अध्यादेशही काढण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अध्यादेशाची अंमलबजावणी अद्यापही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, तृतीयपंथी संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करून कार्यरत करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (०८-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी व त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्याच्या उददेशाने राज्यस्तरावर व विभागीय स्तरावर तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळ यासह, तृतीयपंथी समुदायाशी संबंधीत सर्व बाबी हा विषय दि.०३/१०/२०१७ या शासन निर्णयान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

त्यानुसार विभागस्तरावर तृतीयपंथीय कल्याणासाठी व त्यांच्या हक्काचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करण्याच्या उददेशाने दि.१३ डिसेंबर, २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्याबाबत**

**(२६) ९५८०९ (२३-०८-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण द्यावे या प्रमुख मागणीसह इतर मागण्यासंदर्भात मातंग समाजाने दिनांक १६ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन केलेले असून शासनाकडे वारंवार मागण्या केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्नी अद्याप कोणताही निर्णय घेतला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत, तसेच मातंग समाजाला न्याय देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे : (०९-०७-२०१९)** :(१) हे अंशत: खरे आहे. मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण व इतर मागण्यांसंदर्भात निवेदन व मागण्या प्राप्त होत असतात.

(२) व (३) "मातंग" समाजाचा समावेश अनुसूचित जाती मध्ये असून अनुसूचित जातीसाठी १३% आरक्षण आहे. त्याचा लाभ अनुसूचित जातीमधील सर्व जातींना देय आहे. अनुसूचित जातीचे (अ, ब, क, ड) असे वर्गीकरण करण्यासाठीची बाब तपासण्यात येत आहे.

तसेच मातंग समाजाकडून करण्यात येणाऱ्या मागण्या संबंधीत विभागाकडे उचित कार्यवाही करिता पाठविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ज्येष्ठ नागरीकांचे वय ६५ वरुन ६० वर्षे करण्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष**

**(२७) ९८१५९ (२९-१२-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने ज्येष्ठ नागरीकांचे वय ६५ वरुन ६० वर्षे करण्याबाबतच्या प्रस्तावास, शासनाने मंजूरी दिली नसल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावात ज्येष्ठ नागरिकांना एसटी प्रवास भाड्यात सवलत, श्रावणबाळ योजनेचा लाभ, खाजगी व शासकीय रुग्णालयात मोफत वैद्यकीय उपचार व सुविधा तसेच रक्तदाब, मधूमेह या आजारावरील मोफत औषधे इत्यादींचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती उपायायोजना केली आहे.
(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे : (१४-०३-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) राज्यातील ज्येष्ठ नागरीकांसाठी वयाची अट ६५ वरून ६० करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. त्यास मा.मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती देऊळगांवराजा समितीच्या चौकशीची फेरतपासणी करण्याबाबत**

**(२८) ९८६६३ (०३-०१-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती देऊळगांवराजा समितीच्या ४० ब अंतर्गत झालेल्या चौकशीची फेरतपासणी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, सहकार व पणन मंत्री, राज्यमंत्री तसेच मा.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीची फेरतपासणी करुन शासनास अहवाल सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (११-०७-२०१९) :** (१) होय.
मा.मुख्यमंत्री महोदयांकडे याबाबतचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. मात्र, पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दि.२३.०६.२०१७ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, देऊळगावराजा जि.बुलढाणा समितीचा, ४० (ब) अंतर्गत जो अहवाल प्राप्त झालेल्या चौकशी अहवालाविरूध्द तक्रार केलेली आहे.
(२) व (३) फेरतपासणी करून अहवाल शासनास सादर केलेला नाही. जिल्हा उपनिबंधक, बुलढाणा यांनी चौकशी अहवाल मान्य नसल्यास संबंधितांनी चौकशी अहवालाविरूध्द सक्षम प्राधिकरणाकडे आव्हान देणे आवश्यक आहे, असे स्पष्ट केले आहे.

परंतु, चौकशी अधिकाऱ्याच्या कलम ४० (ब) च्या अहवालानुसार कृषी उत्पन्न बाजार समिती, बुलढाणा यांनी चौकशी अहवालात दोषी आढळून आलेले सदर समितीचे सचिव श्री.मधुकर शिंगणे यांचेवर जबाबदारीच्या रकमांची निश्चिती करून त्यांचेकडून जबाबदारीच्या रकमा वसूलीसाठी त्यांना दि.२५.०४.२०१७ रोजी नोटीस बजावलेली आहे. श्री.म.तु.शिंगणे हे बाजार समितीचे सेवेमधुन सेवानिवृत्त झालेले असून त्यांना बाजार समितीचे नोटीस विरूध्द मा.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे कलम ५२ (बी) अन्वये अपिल दाखल केलेले असुन सद्यस्थितीत सदर अपिल प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवळा (ता.नाशिक) तालुक्यातील उमराणे कृषी उत्पन्न बाजार समितीमधील शेतकऱ्यांना दिलेल्या पिकांचे धनादेश न वटल्याबाबत**

**(२९) १०४१०० (०३-०१-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवळा (ता.नाशिक) तालुक्यातील उमराणे कृषी उत्पन्न बाजार समितीमधील शेतकऱ्यांना दिलेल्या पिकांचे पैसे धनादेश स्वरुपात दिल्याने, सदरहू धनादेश न वटण्याचे प्रकार वाढीस लागून शेतकऱ्यांना ३ महिने पैसे देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्ज घेऊन पिक पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या हक्काचे पिक दिल्यावरही ३-३ महिने पैसे मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाजार समितीमधील शेतकऱ्यांना धनादेश देऊन शेतकऱ्यांची अडवणूक करणाऱ्या स्थानिक प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.राम शिंदे : (१६-०३-२०१९) :** (१) होय.
(२) शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीचे पैसे ३ महिने उशिरा मिळाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचण निर्माण झाली आहे, हे खरे आहे.
(३) उमराणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांनी विक्री केलेल्या शेतमालाचे पैसे थकविले असल्याने ते वसूल करण्यास संचालक मंडळाने कसूर केल्याने सदर संचालक मंडळाविरूद्ध महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४५ (१) नुसार दि.१३.७.२०१८ रोजीच्या आदेशान्वये उमराणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ बरखास्त करून शासकीय प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्ह्यातील खनिज विकास निधीबाबत**

**(३०) १०४३३४ (०१-०१-२०१८). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यास खनिकर्म विभागाकडून सन २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये खनिज विकास निधी मंजुर करण्यात आला परंतु सदर निधीचा उपयोग त्या क्षेत्राच्या विकास कामासाठी करण्याकरीता आला किंवा नाही याची शासनाकडून दखल घेण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (१४-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

दि. ०१-०९.२०१६ रोजी शासनाने अधिसुचनेद्वारे खनिज विकास निधी रद्द करून जिल्हास्तरावरील जिल्हा खनिज प्रतिष्ठानची निर्मिती केली आहे व महाराष्ट्र खनिज विकास निधी वितरित करण्याची कार्यपध्दती देखील संपुष्टात आली आहे.

सन २०१७-१८ मध्ये जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या दिनांक १६/२/२०१७ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी संचालन परिषदेच्या सभेत तालुका तिरोडा येथील १) मौजा अर्जुनी येथील जितेंद्र बोरकर यांच्या घरापासून ते राजेश वालचंद उईके यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम रक्कम रू.०३ लक्ष, २) मौजा घाटकुरोडा-घोगरा येथील रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे रक्कम रू.१० लक्ष, ३)मौजा चांदोरी घाटकुरोडा येथील रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे रक्कम रू.१० लक्ष, असे एकूण रस्त्यांच्या ३ प्रस्तावांना (एकूण रक्कम रू.२३ लक्ष) मंजूरी प्रदान करण्यात आली. त्यानुसार कार्यकारी यंत्रणा, कार्यकारी अभियंत, जि. प. सां. बां. विभाग, गोंदिया यांना मान्यता देण्यात आलेल्या निधीपैकी ४० % निधी रक्कम रू.९.२० लक्ष दिनांक १२.०३.२०१८ अन्वये वितरित करण्यात आली आहे.

सन २०१८-१९ मध्ये जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या दिनांक २९/०९/२०१८ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी संपादन परिषदेच्या सभेत अर्जुनी मोरगांव तालुक्यातील १) मौजा केशोरी, वडेगाव, खोलदा जिल्हा सीमा रस्त्याचे नुतणीकरण काम रक्कम रू.१२ लक्ष, गोंदिया तालुक्यातील २) मौजा कन्हारटोला गांवअंतर्गत रस्ता सिमेंटीकरण करणे रक्कम रू.३ लक्ष, ३) मौजा बघोली येथे नोहरलाल पटले यांच्या घरासमोरील रस्ता सिमेंटीकरण करणे रक्कम रू.३ लक्ष ४) मौजा कलारीटोला-बघोली येथील मुख्य मार्ग ते मुलचंद शेंडे यांच्या घरापर्यत सिमेंटीकरण करणे रक्कम रू.३ लक्ष, आमगाव तालुक्यातील ५) मौजा बुराडीटोला येथे छोटू रिनाईत यांच्या घरापासून ते सोमा वाढई यांच्या घरापर्यत सिमेंट काँक्रेट, रोड बांधकाम करणे रक्कम रू.२.७२ लक्ष ६) मौजा खुर्शीपार येथे नरेंद्र मसराम यांच्या शेताजवळ मोरी बांधकाम करणे रक्कम रू.१.२२ लक्ष, तिरोडा तालुक्यातील ७) मौजा घाटकुरोडा-घोगरा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे रक्कम रू.४० लक्ष असे एकूण ७ रस्त्यांचे प्रस्ताव एकूण रक्कम रू.६४.९४ लक्ष कामांना मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

उपरोक्त प्रमाणे गोंदिया जिल्हयातील क्षेत्राच्या विकास कामासाठी निधीचा वापर करण्यात आलेला आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात देवी-देवतांच्या उत्सवात होणारी पशुहत्या थांबविण्याकरिता कायदा करण्याबाबत**

**(३१) १०६१४० (०६-०४-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात देवी-देवतांच्या उत्सवात होणारी पशुहत्या थांबविण्याकरिता शासनाने कायदा करण्याची मागणी सर्व जीव मंगल प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष यांनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरूप काय आहे व तद्‌नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (२१-०६-२०१९) :** (१) होय.
(२) अंधविश्वासाच्या आहारी जाऊन समाजातील काही व्यक्तिंकडून अथवा घटकांकडून मानवी हत्या, नरबळी, जत्रेसारख्या ठिकाणी होणारी मोठया प्रमाणावर पशूहत्या आदी अंधविश्वासाच्या निर्मूलनासाठी तसेच अंधविश्वास पसरविणा-या व्यक्तिंना शिक्षा होऊन सर्व गैरप्रकारांना आळा बसावा यासाठी या लाखो लोकांचे जीव वाचविण्यासाठी त्यांचे होणारे शोषण व छळ थांबविण्यासाठी व समाजाचे मानसिक स्वास्थ सुधारण्यासाठी शासनाकडून दिनांक २० डिसेंबर, २०१३ रोजी महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानूष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम-२०१३ जारी करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांनी दिलेल्या अहवालाबाबत**

**(३२) १०६५३८ (०६-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी मंडळाच्या कलम ४५ (१) अन्वये स्पष्ट अभिप्राय दिल्यानंतरही श्री.मनोज देशकर, जिल्हा उपनिबंधक, भंडारा यांनी त्यांच्या अधिकाराचा दुरुपयोग करून दुसऱ्यांदा लाखानी बाजार समितीच्या संचालकांची

कायद्यात तरतूद नसतानाही सुनावणी घेवून खोटा अभिप्राय दिला असून सदर अभिप्राय रद्द करण्याच्या मागणीवर विचार करुन शासनाने तो रद्द केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाखणी बाजार समिती संचालक मंडळाने त्यांची सभा क्रमांक १२८ दिनांक १ जून, २०१७ रोजी सदर ठराव पारित केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचा ठराव कायम करण्याबाबत डॉ.दीपराज पी. इमलकर यांचेकडून वारंवार होत असलेली मागणी विचारात घेता सदर ठराव नियमित (कायम) करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२९-०६-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांनी दि.२०.२.२०१७ अन्वये कृषी उत्पन्न बाजार समिती, लाखनी जि.भंडाराचे संचालक मंडळास महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४५(१) अन्वये पाठविलेल्या कारणे दाखवा नोटीशीच्या अनुषंगाने संचालक मंडळाने दि.१३.७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय कळविले होते. तथापि, संचालक मंडळाने अभिप्राय कळविले त्यावेळेस तत्कालिन जिल्हा उपनिबंधक, भंडारा यांची बदली होऊन त्याजागी नविन जिल्हा उपनिबंधक यांची नियुक्ती झाली. नव्याने नियुक्त जिल्हा उपनिबंधक, भंडारा यांनी संचालक मंडळाच्या अभिप्रायानुसार कारवाई न करता आधीच्या नोटीशीबाबत त्यांचे अभिप्राय देऊन दि.३१.१०.२०१७ च्या पत्रान्वये कृषी पणन मंडळाचे पुन्हा अंतिम अभिप्राय मागीतले. त्यानुसार सदर कृषी पणन मंडळाने दि.१३.७.२०१७ च्या पत्रान्वये दिलेले अभिप्राय कायम असल्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांना कळविले आहे.
(२) नाही.
(३) सदर ठराव बाजार समिती लाखनी यांच्या संचालक मंडळाने पारीत केला नसून सदर ठराव कृषी पणन मंडळ, पुणे यांच्या संचालक मंडळ सभेत पारीत केला आहे. सदर ठराव शासनास प्राप्त झाला नसल्यामुळे शासनामार्फत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उस्नानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिक कर्जाच्या व्याज परताव्याबाबत

**(३३) १०८२२१ (०६-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकऱ्यांनी पीक कर्जापोटी घेतलेल्या रक्कमेवर केंद्र व राज्य शासनाकडून व्याज सवलत दिली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँका व्याज परतावा रक्कमेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास असमर्थता दाखवित असल्यामुळे उस्मानाबाद जिल्ह्यातील अनेक गावांतील शेतकरी या लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शेतकऱ्यांना पीक कर्जापोटी घेतलेल्या रक्कमेवर व्याज सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१०-०७-२०१९) :** (१) होय.
(२) नाही.
(३) शेतकऱ्यांना राष्ट्रीयीकृत बँका व जिमस बँका यांच्याकडून ६% व्याजदराने पीककर्ज मिळते. सदर कर्ज मुदतीत परतफेड केल्यास शेतकऱ्यांना व्याज सवलत दिली जाते. १ लाखापर्यंतच्या परतफेडीवर ६ % व्याजमाफी मिळते तसेच १ ते ३ लाखापर्यंतच्या पीक कर्जाच्या मुदतीत परतफेडीवर ४ टक्के व्याज माफी मिळते.

सन २०१७-१८ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यात राष्ट्रीयकृत बँकेमार्फत ४५१४ खातेदारांना रु.९३.३० लाखाचा लाभ देण्यात आला तसेच ग्रामिण बँकेमार्फत २१६६ खातेदारांना रु.४१.५० लाखचा लाभ देण्यात आला.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळण्याबाबत**

**(३४) १०८६२३ (०६-०४-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील सर्व तालुक्यात कांद्याचे उत्पन्न मोठया प्रमाणात झाल्यामुळे कांदयांचे भाव प्रचंड प्रमाणात कमी झाल्याने शेतकरी मोठया अडचणीत आला असून शासनाने जिल्हयासाठी १९ लाख ८७ हजार ३६९ रुपये अनुदान दिले मलकापूर व नांदूर या दोनच तालुक्यातील शेतक-यांना अनुदान देण्यात आले मात्र बाजार समितीत कांदा चाळ नसल्यामुळे उर्वरित तालुक्यांना अदयापी अनुदान देण्यात आलेले नसल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती उर्वरित तालुक्यांनाही अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.राम शिंदे :- (११-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) जुलै, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत राज्यातील कृषि उत्पन्नबाजार समितीमध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना रुपये १०० प्रति क्विंटल व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रती शेतकरी या प्रमाणात कांदा अनुदान शासन निर्णय दिनांक १५/४/२०१७ अन्वये

मंजूर करण्यात आले होते. कांदा अनुदान कालावधी बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर व नांदूरा या दोन बाजार समित्यांमध्ये कांद्यांची विक्री झाल्याने, सदर दोन तालुक्यातील १८६६ पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना रुपये १९,८७,३८९ इतके अनुदान मंजूर करुन वितरित करण्यात आलेले आहे.

जिल्ह्यातील उर्वरित तालुक्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याची विक्री नसल्याने अनुदान मंजूर करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गटसचिवांच्या सेवा नियम वेतनासंबंधी अहवालात केलेल्या शिफारशी लागू करण्याबाबत

**(३५) १०९२५८ (०६-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गटसचिवांच्या सेवा नियम वेतनासंबंधी अद्यापपर्यंत सन १९६१ पासून सन २००४ पर्यंत विविध समित्या नेमण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समित्यांपैकी श्री.यशवंतराव गडाख यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सन २००४ मध्ये शासनास अहवाल सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीने अहवालात केलेल्या शिफारशी शासनाने अद्यापपर्यंत लागू केल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शिफारशी लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-०६-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) प्रा. वैद्यनाथन यांच्या समितीने केलेल्या शिफारशी स्विकृत करून राज्य शासनाने नाबार्ड व केंद्र शासन यांच्यासमवेत दिनांक १३/११/२००६ रोजी सामंजस्य करार केलेला आहे.

वैद्यनाथन समितीने गटसचिवांचे केडर बंद करून विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना सचिव नियुक्तीचे अधिकार देणे अशी शिफारस केली आहे. सदर शिफारशीमुळे संस्थेला स्वत:चा सचिव नेमण्याचा, पगार ठरविण्याचा अधिकार देण्यात आला असून विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना गटसचिवांच्या नेमणूकीबाबत स्वायत्तता प्राप्त झाली आहे. वैद्यनाथन समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये दुरूस्तीदेखील करण्यात आली आहे. दुरूस्तीप्रमाणे गटसचिव संवर्गीकरणासंबंधी कलम ६९ (क) वगळण्यात येऊन कलम ६९ (ख) समाविष्ठ करण्यात आले आहे. त्यानुसार राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

सन २००६ अखेर कार्यरत असलेल्या ८७३३ गटसचिवांच्या सेवा वेतनविषयक प्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ६९ (ख) मधील तरतूदीनुसार कार्यरत गटसचिवांच्या सेवा व वेतनविषयक प्रश्न सोडविण्यासाठी दिनांक ०१/१२/२००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समित्या नियुक्त केल्या आहेत. सदर समित्यांचे अधिकार व कार्यकक्षा शासन निर्णयात नमूद करण्यात आल्या आहेत. कार्यरत गटसचिव सेवानिवृत्त होईपर्यंत सदर व्यवस्था तात्पुरती अंमलात राहणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खर्डा (ता.जामखेड, जि.अहमदनगर) येथील नितीन आगे हत्याप्रकरणी**
**कुटुंबियांना न्याय मिळवून पुनर्वसन करण्याबाबत**

**(३६) १०९३९४ (१९-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डा (ता.जामखेड, जि.अहमदनगर) येथील नितीन आगे हत्याप्रकरणी कुटुंबियांना न्याय मिळवून देणे तसेच त्यांचे पुर्नवसन करण्यासाठी लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटना यांनी मा.सामाजिक न्यायमंत्री व जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास अहमदनगर दौऱ्यावेळी निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अत्याचारग्रस्त कुटुंबियांना न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश (भाऊ) खाडे : (०६-०७-२०१९) :** (१) होय, नितीन आगे हत्या प्रकरणी कुटूंबियांचे पुर्नवसन करण्यासाठी श्री. वैभव तानाजी गिते, राज्य समन्वयक नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीस, नवी दिल्ली यांचे निवेदन दिनांक ०७/०२/२०१७, श्री.सचिन गवांदे व इतर बहुजन समाज पार्टी, अहमदनगर यांचे निवेदन दिनांक २६/१२/२०१७ व श्री.विलास कांबळे, संयोजक महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय अत्याचार निवारण शक्ती (नफ), नवी दिल्ली यांची निवेदन दिनांक १५/१२/२०१७ नुसार विनंती करण्यात आली आाहे.

(२), (३) व (४) मयत नितीन राजू आगे यांची बहीण दुर्गा राजू आगे हीला मुलींचे शासकीय वसतीगृह, ता.जामखेड, जि.अहमदनगर या ठिकाणी शिपाई या पदावर नोकरी दिली आहे. याशिवाय आर्थिक मदत देण्यात आलेली असून जमीन व घरकुल देण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

---

**अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीत नाफेडने केलेल्या खरेदीच्या गैरव्यवहाराबाबत**

**(३७) ११०७३७ (२३-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीत गतवर्षीच्या हंगामात नाफेडने केलेल्या तूर खरेदी मध्ये झालेल्या गैरव्यवहार प्रकरणातील ७० खरेदीदारांना दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास नोटीस बजाविण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गैरव्यवहारातील संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२६-०६-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रस्तुत प्रकरणी चौकशी अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीत नाफेडला जादा तूर विक्री केलेले शेतकरी व व्यापाऱ्यांकडून खरेदी केलेली तूरीची विल्हेवाट यासंदर्भात शेतकऱ्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्याचबरोबर व्यापाऱ्यांनी खरेदी केलेल्या तूरीची विल्हेवाटीसंदर्भात व्यापाऱ्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन तूर खरेदी योजनेमध्ये गैरव्यवहार झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जादूटोणा कायद्याची वादग्रस्त शासकीय समिती बरखास्त करण्याबाबत**

**(३८) ११२३८३ (२३-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जादूटोणा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सन २०१४ मध्ये नेमण्यात आलेल्या शासकीय समितीवर वादग्रस्त व्यक्तींची नेमणूक झाल्यामुळे ती समिती बरखास्त करावी, अशी मागणी विविध संघटना आणि लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास धरणे आंदोलनाच्या माध्यमातून केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीवर नियुक्त करण्यात आलेल्या काही व्यक्तींना गुन्ह्यात शिक्षा भोगलेली असणे, काही सदस्यांना संघटनेमध्ये अनेक गैरव्यवहार झालेला असल्याचे उघड होणे तसेच समितीवर कार्यरत सहअध्यक्षांनी शासकीय कार्यक्रमात संत ज्ञानेश्वर महाराजांविषयी वादग्रस्त वक्तव्य करून वारकऱ्यांच्या धार्मिक भावना दुखावणे, असे प्रकार निदर्शनास आले आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश (भाऊ) खाडे : (१४-०३-२०१९) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्हयातील तूर गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी करण्याबाबत**

**(३९) ११४८४८ (२३-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील तूर गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी नव्याने सुरु झाली असून यामध्ये गुन्हेगारांना सोडून शेतकऱ्यांना लक्ष केले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणांची चौकशी करुन शेतकऱ्यांना विनाकारण लक्ष करु नये अशी मागणी भारत कृषक समाजाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२६-०६-२०१९) :** (१) नाही.
(२) होय.
(३) प्रस्तुत प्रकरणी चौकशी अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीत नाफेडला जादा तूर विक्री केलेले शेतकरी व व्यापाऱ्यांकडून खरेदी केलेली तूरीची विल्हेवाट यासंदर्भात शेतकऱ्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्याचबरोबर व्यापाऱ्यांनी खरेदी केलेल्या तूरीची विल्हेवाटीसंदर्भात व्यापाऱ्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन तूर खरेदी योजनेमध्ये गैरव्यवहार झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विविध औद्योगिक विकास क्षेत्रात पडून असलेले भुखंड औद्योगिक विकास महामंडळाने परत घेतल्याबाबत**

**(४०) ११७१०१ (०४-०८-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे**

**(कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव-कवठेमहांकाळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध औद्योगिक विकास क्षेत्रात पडून असलेले ५४८ भुखंड औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) परत घेतल्याचे माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून शासनाने औदयोगिक वापरासाठी संपादीत केलेल्या जमिनीचे आरक्षण उठविणे व त्यात सुसुत्रता आणणे व अभ्यास करण्यासाठी के.पी.बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमण्यात आली व त्या समितीने आपला अहवाल शासनास दिनांक १ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास शासनास सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, के.पी.बक्षी समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशीचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उद्योग उभारले गेले नाहीत अशा भुखंडधारकांना एमआयडीसीने नोटीस बजावून त्यांच्याकडील भुखंड परत घेतले त्यात सर्वाधिक अमरावती प्रादेशिक विभाग त्या खालोखाल नागपूर, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी या प्रादेशिक विभागांचा समावेश असून उक्त परत घेतलेल्या भुखंडाचा आता नव्या इच्छुक उद्योजकांसाठी लिलाव केला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच एमआयडीसीची १६ प्रादेशिक कार्यालये असून त्यातंर्गत ८३ हजार ९५३ औद्योगिक भुखंड असून प्रत्येक तालुका मुख्यालयी औद्योगिक वसाहती थाटण्यात आल्या मात्र दणवळणाच्या सोयी सुविधांचा अभाव असल्यामुळे तेथे उद्योग उभारले गेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने शासनाने भूखंडावर उद्योग उभारुन तेथे पायाभूत सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (३०-०५-२०१९) :** (१) महामंडळाने ५४८ भूखंड एप्रिल, २०१८ पर्यंत परत घेतले ही बाब खरी आहे. तथापि शासनाने औदयोगिक वापरासाठी संपादीत केलेल्या जमिनीचे आरक्षण उठविणे व त्यात सुसुत्रता आणणे व अभ्यास करण्यासाठी श्री.के.पी.बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमण्यात आलेली नसून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची गोंदेदुमाला आणि वाडीवरे ता. इगतपुरी जि.नाशिक येथील अधिग्रहीत जमिन गैर अधिसूचित करण्याच्या मा.मंत्री यांनी घेतलेल्या निर्णयाची चौकशी करण्याबाबत दिनांक २८/०८/२०१७ रोजीच्या निर्णयान्वये नेमण्यात आली आहे. सदर समितीने शासनास अहवाल सादर केला आहे.

(२) महामंडळाकरिता जमीन संपादन करणे व संपादित जमीन वगळणे याबाबत कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करणे, याबाबत शिफारस आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील परमात्मा एक सेवक संघाच्या शाखांना व्यसनमुक्ती केंद्राचा दर्जा देण्याबाबत**

**(४१) १२०८५० (०४-०८-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर, भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील प्रत्येक गावात परमात्मा एक सेवक प्रोत्साहन संघ ही शाखा सुरु करण्यात येऊन या संस्थेमार्फत व्यसनमुक्ती अभियान राबविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाखांना व्यसनमुक्ती केंद्राचा दर्जा देऊन शासनाने आर्थिक मदत द्यावी अशी मागणी परमात्मा एक सेवक प्रोत्साहन समितीने दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी परमात्मा एक सेवक प्रोत्साहन संघाच्यावतीने सुरू असलेल्या व्यसनमुक्ती अभियान कार्यक्रमास व्यसनमुक्ती केंद्राचा दर्जा देऊन शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश (भाऊ) खाडे : (१४-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही, अशा प्रकारची मागणी प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विविध विमानतळांच्या विकास कामांचे कंत्राट रिलायन्स कंपनी अंतर्गत यवतमाळ एअरपोर्ट प्रा.लि. कंपनीस मिळाल्याबाबत

**(४२) १२१६६९ (०४-०८-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामधील बऱ्याच विमानतळांची देखभाल दुरुस्ती, सोयी-सुविधा पुरविणे तसेच तेथील विकासकामे करणे यांचे कंत्राट रिलायन्स कंपनी अंतर्गत यवतमाळ एअरपोर्ट प्रा.लि. कंपनीस दिनांक ३० ऑक्टोबर, २००९ रोजी वा त्यासुमारास ९५ वर्षाच्या करारावर दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु करार करताना शासनाने कोणकोणत्या अटींचा कंत्राटामध्ये समावेश केला होता, तसेच सदरहु केलेल्या करारामध्ये उस्मानाबाद येथील विमान तळांचा देखील समावेश होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू उस्मानाबाद विमानतळाचा विकास अद्याप न झाल्यामुळे याबाबत अधिकाऱ्यांची बैठक घेण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास पत्रव्यवहार केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्यापपर्यंत बैठक न घेण्याची कारणे काय आहेत,

(५) तसेच राज्यातील सर्व विमानतळांचा विकास करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०४-२०१९) :** (१) होय, खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारीत असलेल्या यवतमाळ, नांदेड, लातुर, उस्मानाबाद व बारामती या विमानतळांच्या खाजगीकरणांसाठी निवीदा काढल्या होत्या या निवीदा उघडून प्राप्त देकार महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठक दिनांक २०/७/२००९ बाब क्र. २४ म्हणून निर्णयार्थ ठेवण्यात आली होती.

सदर बाबीवर संचालक मंडळाच्या दि.२०/७/२००९ च्या बैठकीत बाब क्र. २४ ठराव क्र.४७९७ पारित करण्यात आला आहे. त्यामध्ये M/S Reliance Airport Developers Pvt.Ltd. यांची यवतमाळ, नांदेड, लातुर, गटातील विमानतळ विससीत करण्यासाठीची सर्वाधिक बोली रक्कम रू. २७ कोटी व बारामती व उस्मानाबाद गटासाठी रक्कम रू. ३६ कोटीची बोली स्विकारण्यात आली.

त्यानुसार नांदेड, लातुर व उस्मानाबाद ही विमानतळे शासनाच्या मालकीची असल्याने व त्यांचा समावेश दोन्ही गटात असल्याने ठराव शिफारसींसह शासनाकडे महामंडळाने दि.३०/७/२००९ रोजी सादर केला होता. सदर प्रस्तावास शासनाने दिनांक २८/८/२००९ रोजी मान्यता दिली आहे.

(२) होय.

करारनाम्यामध्ये रिलायंस कंपनीने खालील कामे त्यांचे स्वखर्चाने करणेबाबतच्या अटींचा समावेश केलेला आहे.

१) विमानतळांची देखभाल व दुरूस्ती करणे,सुख सुविधा पुरविणे.
२) प्रचलित नियमास अधिन राहून विमानतळ कार्यरत ठेवणे.
३) भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांचे मानकानुसार नविन सुधारणा करणे.
४) विमानतळास २४ तास सुरक्षा पुरविणे.
५) आग्निरोधक सुरक्षा कार्यान्वित करणे.
६) हवामानासंबंधी सेवा संबंधित सेवा संबंधित खात्याकडून स्वखर्चाने घेणे.
७) उपयोगितासाठी आरामासाठीची जागेची सोय.
८) विमानतळ विमानसेवेसाठी २४ तास खुले ठेवणे.
९) रात्री विमान उतरविण्याची सुविधा असलेल्या विमानतळावर दिवसा तसेच रात्रीच्या वेळी विमानसंवा कार्यान्वित करणे.

(३) होय.

(४) सदर प्रकरणी बैठक घेण्याचे प्रस्तावित आहे.

(५) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारीत यावतमाळ, नांदेड, लातुर उस्मानाबाद व बारामती येथील विमानतळे आहेत.

उस्मानाबाद विमानधावपट्टी ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २००६ रोजी हस्तांतरीत केले आहे. याबाबतचा करारनामा करून महामंडळास ताबा दिनांक ३/११/२००९ रोजी देण्यात आला आहे. सदर विमानतळावर महामंडळाने १२१८ मी. लांबीची धावपट्टी, नवीन समांतर टॅक्सी वे भूखंडाभोवती तारेचे कुंपन व संरक्षण भिंत इ. विकास कामे पूर्ण करण्यात आली आहे.महामंडळातर्फे मे.लातुर एअरपोर्ट डेव्हलपर्स प्रा.लि. यांना लातुर विमानतळाचे हस्तांतरण झालेल्या करारनाम्याप्रमाणे विमानतळाच्या धावपटटीच्या दोन्ही बाजूच्या जमीनींचा विकास करणे या कामाचा अंतर्भाव होता. नांदेड विमानतळ व्यवस्थापन व विस्तारीकरणाचे काम नांदेड एअरपोर्ट प्रा.लि. यांचे मार्फत सुरू आहे. नांदेड विमानतळावरून आर.सी.एस. योजनेंतर्गत दि.२७/४/२०१७ पासून विमानसेवा सूरू आहे. मुंबई व हैद्राबादसाठी दररोज विमानसेवा आहे. तसेच अमृतसरसाठी आठवडयातून दोन दिवस शनिवार व रविवार विमानसेवा आहे. नांदेड येथील विमानतळ मे.रिलायंस यांच्या एअरपोर्ट प्रा.लि. कंपनीकडून देखभाल व दुरूस्ती करून सुस्थितीत ठेवण्यात आले आहे. माहे, नोव्हेबर २०१७ मध्ये विमानतळाच्या धवपटटीचे डांबरीकरण व संबंधित कामे करण्यात आली आहेत. कोल्हापूर विमानतळ दि.३१/८/२०१३ रोजी भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्याकडे हस्तांतरण करण्यात आले आहे. त्यानंतरचे या विमानतळाचे दुरूस्ती, देखभाल व नियंत्रण तसेच विकास इ. कामे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्यार्मार्फत पाहण्यात येत आहेत. बारामती विमानतळ, रिलायंस एअरपोर्ट डेव्हलपमेंट प्रा.लि. कंपनीचे स्पेशल पर्पज व्हेहीकल (Special Purpose Vehicle) बारामती एअरपोर्ट प्रा. लि.या कंपनीस दि.५/११/२००९ रोजी करारान्वये (Lease Deed) ९५ वर्षाच्या मुदतीसाठी महामंडळाने विमानतळाच्या क्षेत्रामध्ये केलेल्या विकासकामासह हस्तांतरीत करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था यांना जेष्ठ नागरिकांच्या ओळखपत्रासाठी होलोग्राम बनविण्यास मान्यता देण्याबाबत**

**(४३) १२२३६३ (०४-०८-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था यांना ज्येष्ठ नागरिकांचे ओळखपत्रासाठी होलोग्राम बनविण्यास मान्यता देण्याबाबत शासनाकडे पत्र व्यवहार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डिग्निटी फाऊन्डेशन या संस्थेने राज्य शासनाच्या होलोग्रामचे पेटंट स्वतःच्या नावाने घेऊन शासनाची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र मिळण्याबाबत तसेच डिग्निटी फाऊन्डेशन या संस्थेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे : (१२-०६-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

शासनाने दिनांक ०६/०५/२००३ व दिनांक २३/०२/२००४ च्या शासन निर्णयानुसार डिग्नीटी फाऊंडेशन व महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेसकॉम) मुंबई यांना ज्येष्ठ नागरिकांसाठी ओळखपत्र तयार करुन देण्यासाठी प्राधिकृत केले आहे.

(३) लागू नाही

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याच्या प्रस्तावासोबत भोगवटा प्रमाणपत्र व बांधकाम नियमित असल्याचा दाखला जोडण्याची अट रद्द करण्याबाबत**

**(४४) १२४७४७ (०४-०८-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकार आयुक्त यांनी दिनांक ३ मार्च, २०१७ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याच्या प्रस्तावासोबत भोगवटा प्रमाणपत्र वा बांधकाम नियमित असल्याचा दाखला जोडण्याची अट घालण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिपत्रकामुळे सहकारी गृहरचना संस्था नोंदणी पूर्णपणे मंदावली असल्याने ते रद्द करण्याची मागणी महाराष्ट्र सोसायटीज वेल्फेअर असोसिएशन तसेच इतर सामाजिक संघटनानी मा.सहकार आयुक्त यांना दिनांक ८ जून, २०१८ वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकाम नियमित असल्याचा दाखला बांधकाम मंजूर करणारे प्राधिकरण देत नाही हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास सदर परिपत्रक रद्द करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-०६-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही, बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे तसेच त्यामधील अटी शर्तीचे पालन करुन केलेले असल्यास तसेच आवश्यक असलेली ना-हरकत प्रमाणपत्रे सादर केल्यास संबंधित नियोजित प्राधिकरण असणा-या महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायती यांचेकडून भोगवटा प्रमाणपत्र अथवा बांधकाम नियोजित असल्याचा दाखला मिळण्यास अडचण येत नाही. तसेच भोगवटा प्रमाणपत्र ही सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ अंतर्गत सेवा म्हणून घोषित करण्यात आलेली आहे.
(४) अनधिकृत बांधकाम झालेल्या इमारतींची सहकारी संस्था म्हणून नोंदणी करण्यात येवू नये असे निदेश मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी याचिका क्र.१५९/२०१३ वरील सुनावणी दरम्यान दिले आहेत. सदर न्यायालयीन निदेशाचे पालन करण्याच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकरणाकडून भोगवटा प्रमाणपत्र मिळत नसल्यास गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीस अडथळा येवू नये म्हणून नियोजित संस्थेची इमारत अधिकृत असल्याचा सक्षम प्राधिकरणाचा दाखला नोंदणी प्रस्तावासोबत जोडणेबाबत दि.३ मार्च, २०१७ च्या परिपत्रकान्वये सुचना दिलेल्या आहेत. त्यामुळे सदरचे परिपत्रक रद्द करणे योग्य ठरत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात आलेल्या ट्रॅक्टर वाटपात झालेली अनियमितता

**(४५) १२६३३० (०४-०८-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील सामाजिक न्याय विभागामार्फत सन २०१५-१६ व २०१६-१७ दरम्यान ३०० ट्रॅक्टरचे वाटप करतांना अर्जदारांच्या अग्रक्रमाने वितरित न करता मनमानीपणे वाटप केले असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ट्रॅक्टरचे वाटप करतांना योग्य ती कागदपत्रे न घेता वाटप करण्यात आल्याचे कार्यालयातील कागदपत्रांच्या तपशिलावरुन निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या विभागातील संबंधित तत्कालिन अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे : (१४-०६-२०१९) :** (१) व (२) सन २०१५-१६ मध्ये अर्जदारांकडून जसे अर्ज प्राप्त होतील तसे म्हणजेच क्रमानुसार मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधनाचे वाटप करण्यात आले व सन २०१६-१७ मध्ये लक्की ड्रॉ पध्दतीने लाभार्थ्यांची निवड करण्यात येऊन त्यांच्या कागदपत्रांची काटेकोर पडताळणी करुन वाटप करण्यात आले.

(३) सदर प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश दिले असून चौकशीत दोषी आढळणा-यांवर कारवाई करण्यात येईल,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ७४ विशेष शिक्षकांना गेल्या २१ महिन्यांने वेतन मिळण्याबाबत**

**(४६) १२६५२९ (०४-१२-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १ हजार विशेष व अपंग विद्यार्थ्यांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणणाऱ्या ७४ विशेष शिक्षकांना गेल्या २१ महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विशेष शिक्षकांचे वेतन तातडीने अदा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश (भाऊ) खाडे : (२०-०६-२०१९) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील कांदा बटाटा बाजारातील व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची देणी थकविल्याबाबत**

**(४७) १२७२९० (०४-१२-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील १८ शेतकऱ्यांनी त्यांचे उत्पादन नवी मुंबईतील कांदा बटाटा बाजारातील वीर ट्रेडिंग कपंनीला विकले असून, सदर व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांचे ७ लाख ३२ हजार रुपये थकविल्यामुळे प्रशासक आणि सचिवांनी व्यापाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दिलेल्या आदेशानुसार शासनाने किती व्यापाऱ्यांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.राम शिंदे : (१४-०६-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

पुणे जिल्हयातील १८ शेतकऱ्यांनी रक्कम रु.७.३२ लाख न मिळाल्यामुळे त्यांनी दि.२०.३.२०१८ रोजी मुंबई बाजार समितीकडे तक्रार केली होती. सदर तक्रारीनुषंगाने बाजार समितीने सुनावणी घेतली असता, संबंधित वीर ट्रेडिंग कंपनीने संबंधीत शेतकऱ्यांच्या माल विक्रीची रक्कम देण्याचे मान्य केले. तथापि, सदर ट्रेडिंग कंपनीने विहीत मुदतीत शेतकऱ्यांना रक्कम अदा केली नाही. त्यामुळे बाजार समितीने वीर ट्रेडिंग कंपनी यांना जाहिर नोटीस देऊन, गाळा जप्त करुन ताब्यात घेतला. सदर गाळा जप्तीच्या कार्यवाही विरुध्द कंपनीने मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मा.न्यायालयाने शेतकऱ्यांच्या शेतमालाची रक्कम एक महिन्याच्या आत मे.वीर ट्रेडिंग कंपनी यांनी बाजार समितीकडे जमा करावी, अन्यथा गाळा लिलावाद्वारे विक्री करण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी असा आदेश दिला होता.

मा.न्यायालयाच्या आदेशामुळे कंपनीने दि.१८.८.२०१८ रोजी शेतकऱ्यांची देय असलेली रक्कम रु ७.३२ लाख बाजार समितीकडे जमा केली. बाजार समितीने सदर रक्कम शेतक-यांना दि.२८.८.२०१८ रोजी वैयक्तीक धनादेशाद्वारे अदा केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सहकार क्षेत्रातील बंद झालेला शिक्षण निधी पुन्हा सुरु करण्याबाबत**

**(४८) १३०२४८ (०४-१२-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकार क्षेत्रातील बंद झालेला शिक्षण निधी पुन्हा सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीचा कालावधी काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख (११-०७-२०१९) :** (१) सहकारी क्षेत्रातील संस्थामधील सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी अधिसूचित केलेल्या संस्थांना शिक्षण निधी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४अ अन्वये सुरु आहे. त्यामुळे तो सुरु करण्याचा प्रश्न उद्भवत नाही

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील डाळींब उत्पादक शेतकऱ्यांचे थकीत पैसे मिळण्याबाबत**

**(४९) १३१३५० (०४-१२-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील शेतकऱ्यांचे डाळींब मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वाशी, नवी मुंबई येथील व्यापारी श्री.सुर्यकांत ढोले यांनी माहे सप्टेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान खरेदी केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डाळींब उत्पादक शेतकऱ्यांचे व्यापारी ढोले यांनी अद्यापपर्यंतपैसे दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने डाळींब उत्पादक शेतकऱ्यांचे व्यापाऱ्याकडून पैसे मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.राम शिंदे (१४-०६-२०१९) :** (१), (२), व (३) मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या फळ बाजार आवारातील गाळा क्र.एम-७६५ चे गाळाधारक (व्यापारी) यांनी सन २०१७-२०१८ या कालावधीत डाळींब या शेतमालाच्या विक्रीचे पैसे शेतकऱ्यांना न दिल्याबाबत एकूण ४४ शेतकऱ्यांनी रूपये ५८,२९,७३१/- इतक्या रकमेची तक्रार बाजार समितीकडे केली होती. यात अकोले, जिल्हा अहमदनगर येथील ३ शेतकऱ्यांचा समावेश होता.

बाजार समितीने प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित व्यापारी श्री.ढोले यांना शेतकऱ्यांची थकीत देय असलेली रक्कम तातडीने अदा करण्याबाबतची नोटीस दिली होती. सदर व्यापारी यांनी दिलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांची रक्कम अदा न केल्यामुळे श्री.ढोले (व्यापारी) यांचा गाळा क्र.७६५ जप्त करून ई-निविदा पध्दतीने सदर गाळयाची लिलावाद्वारे विक्री केली. लिलावाद्वारे रू.४१ लाख प्राप्त झाली. सदरची रक्कम शेतकऱ्यांनी मागणी केलल्या एकूण रकमेपेक्षा कमी असल्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी त्याच्या थकीत रकमेच्या ६९.७०% इतकी रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात आली आहे. उर्वरित शिल्लक रक्कम वसुल करण्याबाबतची कार्यवाही बाजार समितीमार्फत कायद्यातील तरतूदीनुसार सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतमालाच्या थेट विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी सोसायट्यांमध्ये कॉप शॉप उभारण्यास परवानगी दिली असल्याबाबत**

**(५०) १३३३१६ (०४-१२-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतमालाच्या थेट विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी सोसायट्यांमध्ये कॉप शॉप उभारण्यास परवानगी दिली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालास रास्त भाव मिळणार असल्याचे ही निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची योजना यशस्वी होण्यासाठी शासन काय नियमावली करणार आहे,
(४) असल्यास, सदर योजनेचा लाभ कधीपर्यंत शेतकऱ्यांना होणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**प्रा.राम शिंदे : (१३-०६-२०१९) :** (१) होय.
(२) होय.
(३) दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेले आहे.
(४) आतापर्यंत ३७ शेतकरी उत्पादक कंपन्या व बचत गटांमार्फत शहरी गृहनिर्माण सोसायट्यामध्ये १५६ कॉप-शॉप सुरु केले असून, ही व्यवस्था कायमस्वरुपी निर्माण होईल यासाठी प्रयत्न सुरु आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.